**'तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलाशी**

या तुकोबा रायांच्या ओळींची आठवण झाल्याशिवाय रहात नाही

**'लाली मेरे लाल की जित देखूँ तित लाल ।**
**लाली देखन मैं गयी मैभी हो गयी लाल ॥'**

'देव पाहावयासी गेलो, देव होऊनिचि ठेलो ।' संत तुकाराम महाराजांच्या ओळीशी कबीरांच्या अनुभूति किती मिळत्या जुळत्या आहेत!

एकिकडे कबीर अशा आंतरिक सुखद अध्यात्मिक अनुभूतींनी सुखावत राहिले तर दुसरीकडे बाह्य समाजातील विषमता पाहून तितकेच दु:खी होत राहिले.

**'माला तो कर में फिरै**
**जीभ फिरै मुखमाहि ।**
**मनुआ तो चहुँ दिसि फिरै,**
**यह तो सुमिरन नाही ॥'**

'माळ हातात फिरते, जीभ मुखात ... आणि त्याच वेळी मन दाही दिशांना भटकतय हे तर खरं नामस्मरण नाही ... हा फक्त देखावा आहे.'

**'एक जोती से सब उतपन्ना,**
**का बामन का सूद्रा ।'**

सर्वांचा जन्म एकाच ज्योतीतून, तेजातून झाला आहे. मग हे श्रेष्ठ-कनिष्ठ असं मानणं किती मूढपणाचं आहे!'



**'कंकड पत्थर जोरिके मसिद**
**लाई बनाय ।**
**तां चढि मुल्ला बांग दे क्या बहरा**
**भया खुदाय ॥'**

'दगडाचे चार तुकडे जोडून मशीद तयार करून व त्यावर उभे राहून 'मुल्ला' बांग देतोय ईश्वर काय बहिरा आहे काय?'

वास्तविक मुंग्यांच्या पायात वाजणाऱ्या घुंगराचाहि आवाज त्याला ऐकू येतो. (चिटीओं के पैरो में घुंगरू बजते है वो भी अल्लाह सुनता है) मग अशा व्यर्थ आक्रोशाची गरज काय?

मुस्लिमांप्रमाणेच हिंदू धर्मातील मूर्तिपूजेवरही कबीरांनी आपल्या बुद्धिवादी तर्कनिष्ठ प्रतिभेने ताशेरे ओढले.

**'पत्थर पुजै हरि मिलै तो मै पुजूं पहार ।**
**घर की चाकिया कोई न पुजै पीस खाय संसार ।**

'शेंदराने माखलेला एखादा साधा दगड पुजल्याने जर ईश्वर मिळत असेल तर मी चांगला भला मोठा डोंगरच पुजतो ना! (त्यामुळं मला फारच मोठी प्राप्ती होईल) अरेरे, काय हे अज्ञान !... वास्तविक पहाता शेंदराच्या दगडपेक्षा जात्याचा दगड अधिक पूजनीय आहे. कारण त्यामुळं निदान पीठ तरी मिळत ... पण जात्याच्या दगडाची पूजा कुणीही करत नाही.'

याठिकाणी कबीरांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन किती समर्थपणे स्पष्ट होतो हे पाहण्यासारखं आहे.

**'काशी काठै घर करै पीवै निरमल नीर ।**
**मुकुती नही हरि नाऊँ बिनु यौ कहे दास कबीर ॥**

'काशीत घर करून आणि नित्य गंगाजल पिऊन काय साधणार ... मुक्तीसाठी खऱ्या भक्तीचीच गरज आहे.

**'केसौ कहा बिगारिया, जे मुडै सौबार ।**
**मन कौ काहे न मुडिए जामै विषय विकार ॥**

## ॥ मनाचे मुंडन करा ॥

'हे मूढ साधकांनो ! वारंवार मुंडन करून केशवपन करण्यापेक्षा आपल्या मनाचंच मुंडन (दमन) का करीत नाही! खरं पाहता मनातच अनेक विकार वस्ती करून असतात तेच तुम्ही नष्ट करा ना. बिचाऱ्या केसांनी काय केलंय! त्यांनाच तुम्ही वारंवार कापता विकारावर विजय मिळविणं हाच साधकाच्या दृष्टीने खरा मार्ग होय. मुंडन करणं हा केवळ दिखाऊपणा आहे.

**'तीरथ व्रत नेम किए । ते सबै रसातल जाहि ॥'**

'तीर्थयात्रा व्रत वैकल्य करणारे सर्व कर्मठ मूढजन स्वर्गात नव्हे तर रसातळाला जातात.

अशा प्रकारे हिंदू-मुस्लिम या दोन्ही धर्मातील बाह्य अवडंबरांवर कबीरांनी कडाडून हल्ला चढविला डॉ. हजारी प्रसाद द्विवेदी यांच्या शब्दात 'कबीर ऐसेही मिलन बिन्दूपर खडे थे, जहाँ से एक ओर हिंदूत्व निकल जाता है और दुसरी ओर मुसलमानत्व उसी प्रशस्त चौराहेपर वे खडे थे । वे दोनो ओर देख सकते थे । और परस्पर विरुद्ध दिशा मे गये हुऐ मार्गों के दोष गूण उन्हे स्पष्ट दिखाई दे रहे थे।'

**'मै के ही समजाऊँ सब जग अन्धा ।**
**इक दुई हुई तो उन्हे समजाऊँ**
**मै केही समजाऊँ ?**

'समजातील दोष, भेदाभेद, जातीवाद, अज्ञान, रुढी परंपरा पाहता पाहता संत कबीरांच्या बुद्धीला एक प्रकारचा थकवाच आला होता. त्यातून या ओळींनी जन्म घेतला असावा... 'एखाद दुसरा आंधळा असता तर बरं झालं असतं. त्याला समजावून सांगता आलं असतं... पण इथं तर सारं जगच आंधळ आहे. आता मी कुणाकुणाला समजावत फिरू, काय करू ?'

संत कबीरांच व्यक्तिमत्त्व अध्यात्मवादी असलं तरी केवळ दैवावर भरोसा ठेवून आळसाला खतपाणी देण्याची त्यांची वृत्ती नव्हती.

'केल्याने होत आहे रे आधी केलेचि पाहिजे' समर्थांच्या या उक्तीप्रमाणे ते प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारे होते. उदा :-

'प्रयत्न सागरात जे उतरले, खोल खोल गेले त्यांनीच आयुष्यात यश मिळविलं... पण मी बापडा बुडायला घाबरलो अन् रिक्त हातानेच किनाऱ्यावर बसून राहिलो.'

संत ज्ञानेश्वरांच्या साहित्याशीही काही ठिकाणी कबीरांचा दृष्टिकोन साम्याचा वाटतो. उदा. :

तर संत ज्ञानदेव म्हणतात -


**'तुज सगुण म्हणो की निर्गुण रे ।**
**सगूण निर्गुण एकु गोविंदु रे ॥'**

## ॥ कबीरांच्या दोह्यांची गुणवैशिष्ट्ये ॥

निर्गुण निराकार ईश्वरावर दृढभाव, सगुणाचाही योग्य तो पुरस्कार, बहुदेवता वादाचा विरोध, सद्गुरुचं महत्त्व, जाती धर्म संप्रदायवादी भेदभावाचा निषेध, रूढी परंपरागत कर्मठतेचे खंडन, भजन, नामस्मरणाचे मंडन, ईश्वराविषयी विरह भावनेचे प्रकटीकरण, लोक संग्रहाचं महत्त्व, मानवतावादाचा पुरस्कार, गूढ विचार सरणी, कनक, कामिनी विषयी लालसा नसलेला दृष्टिकोन, मध्ययुगीन संत साहित्याची ही सर्व गुणवैशिष्ट्ये संत कबीरांच्या साहित्यातही पुरेपूर दिसून येतात.

संत कबीरदासांचा मनोपिंड ज्ञानोपासक असल्याचं जाणवतं.

**'संतौ भाई आई ग्यान की आंधी रे ।**
**भ्रम की टाटी सबै उडानी रहे ना माया बांधी रे।**



'हे संत जन हो!... पहा ज्ञानरूपी प्रचंड वादळ उठलंय आणि त्यात भ्रमरूप छपरं उडून चाललीत. आता काही झाल तरी माया टिकाव धरूच शकणार नाही. पहा, पहा ज्ञानरूप हे वादळ कसं झेपावतंय !'

संत कबीरांचा मनोपिंड ज्ञानोपासक असला तरी अंतिम निर्णय त्यांनी ज्ञानापेक्षा प्रेमाकडेच दिलेला दिसतो. उदा :

**'जा घट प्रेम नाही, सो घट जान स्मशान ।**
**जैसे खाल लुहार की सासलेत बिनू प्राण ॥**

'लोहारचा भाता ज्याप्रमाणे प्राणाशिवायही श्वासोच्छवास करतो त्याचप्रमाणे ज्या देहात प्रेम वसत नाही तो देह स्मशानवत व्यर्थ होय.'

आणखी एका दोह्यातून कबीरानं प्रतिपादित केलेलं प्रेम महात्म्य मोठं मार्मिक वाटतं.

**'पोथी पढि पढि मुआ**
**पंडित भया न कोय ।**
**ढाई अक्षर प्रेम का पढै सो**
**पंडित होय ॥**

'ग्रंथ वाचून वाचून जग कंटाळलं, विटलं तरीही कुणी 'पंडित' होऊ शकला नाही... पण प्रेमाची अडीच अक्षर ज्यानं जाणली तोच खरा ज्ञानी, कारण प्रेम हेच ज्ञानाचं सार होय.'

आजच्या स्वार्थी राजकारणी युद्धजन्य काळ्या कभिन्न पार्श्वभूमीवर संत कबीरदासांनी दिलेला हा प्रेमाचा संदेश विद्युल्लतेप्रमाणे तेजस्वी वाटतो... किती अंतर्मुख करतो !

हैड्रोजन बॉम्ब, न्यूट्रॉन बॉम्ब व विविध प्रकारची सर्वसंहारक अण्वस्त्र निर्माण करून एकमेकाला बेचिराख करू पाहणाऱ्या तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या 'आधुनिक जगाला' संत कबीरदासांचा हा 'अडीच अक्षरांचा' प्रेमाचा मंत्र खऱ्या अर्थाने कळला तर किती बरं होईल !

卐 卐 卐

## श्रीमद् आचार्य यांच्या स्तोत्रावरील एक चिंतन

# ततः किम्

एस्. ए. कुलकर्णी

मानवाला 'आपण म्हणजे कोण?' हे जोपर्यंत समजत नाही, तोपर्यंत त्याला सत्यसुख लाभत नाही; त्याला सत्यज्ञान प्राप्त होत नाही. 'मी' किंवा 'आपण' याचा अर्थ 'माझा देह' 'आपला देह' अशीच सर्वसाधारण समजूत असते. जेव्हा आपण गाढ निद्रेत असतो, तेव्हा आपल्याला या देहाची (मीची) जाण असते का? ज्ञानदेव ज्ञानेश्वरीच्या १४ व्या अध्यायांत विवरण करतात - पैं निद्रिताचेनि आंगेंसिं । सांपु तैसी उर्वशी । तेवि स्वरूपावस्था सरिसीं । देही द्वंद्वें ।। गाढ निद्रेंत असलेल्या माणसाच्या शेजारी एखादा भयानक साप असला काय किंवा एखादी अप्सरेसारखी लावण्यवती असली काय - या दोन्हीची खबर देहाला ('मी' ला) नसते. म्हणजे 'मी' म्हणजे हा देह नव्हे. त्याचप्रमाणे स्वप्नामध्यें आपण दूर कुठल्या देशांत आहोत - फ्रान्स, अमेरिका, चीन वगैरे, किंवा हिमालयावर हिंडतो आहोत, राष्ट्रपती भावनांत आहोत असं काहीही आपल्याला दिसतं; पण प्रत्यक्षांत आपण फक्त आपल्याच बिछान्यावर असतो. देह आहे तिथेंच आहे. म्हणजे अशी दृश्ये स्वप्नात पाहणारा 'मी' म्हणजे हा देह नव्हे. म्हणून ज्ञानदेव १५ व्या अध्यायांत विवरण करतात - 'अर्जुना गा ययापरी । साकारू कल्पौनि पुरी । आत्मा विस्मृतिची करी । नींद तेथ ।।' 'मी' म्हणजे माझ्या देहाचा आकार, माझा देह ही कल्पना चुकीची आहे. अंतरंगामध्ये जो 'आत्मा' किंवा 'चैतन्य' असते, तो खरा 'मी'. त्याचं ज्ञान म्हणजेच अध्यात्मज्ञान. अध्यात्माची व्याख्याच अशी आहे - 'आत्मानम् अधियते इति अध्यात्मं. स्वत:ला सत्य स्वरूपांत ओळखणं म्हणजेच सत्यज्ञान; आत्मज्ञान. **'तुजे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी'** स्वत:ला स्वत:ची ओळख नसते म्हणून जीवन फसते आणि सुख-दु:खाचा अनुभव घेत वणवण भरकटत जाते. मृत देहाला कुणीही घरांत ठेवून घेत नसतं. **'वमेलिया अन्ना । लाळ न घोटी रसना । अंगा न सुवें आलिंगना । प्रेताचिया ।।'** अशी देहाची अवस्था आहे. उलटी होऊन मुखातून बाहेर पडलेल्या अन्न कणांचं रसनेला आकर्षण वाटत नाही; किंवा 'प्रेता' ला आलिंगन द्यायला कुणीही तयार होत नाही. भले ती पत्नी असो, पुत्र असो, कन्या, भाऊ, भगिनी कोणीही असो. प्राण गेल्यावर देहाला स्मशानाचीच वाट धरावी लागते.

या संदर्भांत आद्य जगद्गुरू शंकराचार्य यांनी **'अनात्मश्रीविगर्हणम्'** या शीर्षकाचे एक यथार्थ व सुंदर स्तोत्र लिहिलेलं आहे. आत्मज्ञान करून देणारं हे स्तोत्र अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आणि साहित्याच्या दृष्टीने अतिशय मनोहर आहे. संस्कृत भाषेंतील हे रमणीय ज्ञानस्तोत्र केवळ १८ श्लोकांचं आहे. त्याचा सुलभ अनुवाद मी या लेखांत सादर करतो आहे. या सुमंगल व पवित्र स्तोत्रानें आपल्याला जीवनाची खरी दिशा जरूर समजून येते.

**लब्धा विद्या राजमान्या ततः किं**
**प्राप्ता संपत्प्राभवाढ्या ततः किंम् ।**
**भुक्ता नारी सुनदृराङ्गी ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽ भूत् ।।१।।**

कितीही मोठी विद्या संपादित केली, अत्युच्च पदव्या मिळविल्या, तरी त्याचा काय उपयोग? वरिष्ठ अधिकार प्राप्त झाले, कितीहि विपुल संपत्ती मिळविली, तरी त्याचा काय उपयोग? सुंदर स्त्रीच्या सांनिध्यात सुखानें आयुष्य घालविले, तरी त्याचा काय उपयोग? जोपर्यंत आत्मज्ञान होत नाही, आत्मसाक्षात्कार होत नाही, तोपर्यंत पूर्ण समाधान प्राप्त होऊ शकत नाही. (कारण या सर्व बाबी आपल्याबरोबर येत नाहीत. सारं इथल्या इथे राहतं. सारी धडपड निरर्थकच ठरते. **'नको नको मना गुंतु मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासावया ।'** असं संतवर तुकोबाराय म्हणत नाहीत का?)

**केयूराद्यैर्भूषितो वा ततः किं**
**कौशेयाद्येवरा वृ तो वा ततः किंम् ।**
**तृप्ता मृष्टान्नादिना वा ततः किम् ।**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽ भूत् ।।२।।**

## श्रीमद् शंकराचार्य

Adi Shankara and disciples



विविध प्रकारच्या अलंकारांनी देह कितीही सजविला, तरी त्याचा काय उपयोग? उत्तमोत्तम वस्त्रें परिधान करून कितीही मिरविले तरी त्याचा काय उपयोग? अगदी मिष्टान्न-खमंग भोजन आकंठ सेवन केलं, तरी त्याचा उपयोग काय? जोवर आत्मज्ञान-आत्मसाक्षात्कार होत नाही, तोंवर सारं व्यर्थ !

(मृत्युनंतर बरोबर यातलं काहीहि संगती येत नाही. **'येशी उघडा, जाशी उघडा'** असं या देहाचं स्वरूप आहे. भोजनाने तृप्ती आली तरी पुन: भूक लागतेच ना?)

**दृष्टा नाना चारुदेशास्ततः किं**
**पुष्टाचेष्टा बन्धुवर्गास्ततः किम्।**
**नष्टं दारिद्र्यादि दुःख ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽभूत् ॥३॥**

सृष्टिसौंदर्याने नटलेले अनेक देश पाहिले, आप्तेष्ट-सगे-सोयरे यांना भरपूर मेजवान्या दिल्या, तरी त्याचा काय उपयोग? अमाप संपत्ती मिळविली, अनेक सुखोपभोग भोगले, तरी अंतीम समाधान प्राप्त झाले का? आत्मज्ञान आत्मसाक्षात्काराचा अनुभव घेतला नाही, तरी सगळं व्यर्थ, (**सोइरे धाइरे दिल्या घेतल्याचे । परि अंतकाळीचें नाही कोणी ॥** असं तुकारामही सांगतात आवर्जून)

**स्नातं तीर्थे जह्नुजादौ ततः किं**
**दानं दत्तं द्व्यष्टसंख्यं ततः किम्।**
**जप्ता मन्त्राः कोटिशो वा ततः किं**
**येन आत्मा नैव साक्षात्कृतो ऽभूत् ॥४॥**

पवित्र नद्यांमध्ये स्नानकेले, विविध प्रकारचा दानधर्म केला, कोट्यावीध नामजप केला, तरी त्याचा उपयोग काय? जोंवर आत्मज्ञान होत नाही आत्मसाक्षात्कार होत नाही, तोंवर सारं व्यर्थ!

(**जाऊनिया तीर्था काय तुवा केले । चर्म प्राक्षाळिलें वरी वरी । अंतरिचे शुद्ध कासयाने जालें । भूषण त्वां केले आपण या ॥'** असं तुकारामही म्हणतात.)

**गोत्रं सम्यग्भूषितं वा ततः किं**
**गात्रं भस्माच्छादितं वा ततः किम्।**
**रुद्राक्षादिः संघृतो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽभूत् ॥५॥**

सदाचारानें उत्तम विद्येने कुलाला भूषण प्राप्त करून दिले, सर्वांगाला भस्माचे विलेपन केले, गळ्यामध्ये रुद्राक्ष, प्रवाळ तुळशीमाळा धारण केल्या, तरी त्याचा काय उपयोग? जोंवर आत्मसाक्षात्कार होत नाही, तोंवर सारं विफल. (**माकडाचे गळा मोलाचा मणि । घातला चावुनी टाकी थुंकोनि।'** असा हा प्रकार असतो.)

**अन्नैर्विप्रास्तर्पिता वा ततः किं**
**यज्ञैर्देवास्तोषिता वा ततः किम् ।**
**कीर्त्या व्याप्ताः सर्वलोकास्ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोभूत् ॥६॥**

अन्नदान केले, सहस्त्रभोजने घातली, यज्ञयाग केले, जगांत या ना त्या प्रकारची कीर्ति मिळविली, तरी त्याचा उपयोग? आत्मसाक्षात्काराविना सार निष्फळ ! (**अश्वमेधा कोडि कीजे । रत्नाभरौनि पृथ्वि दीजे । एकांगुष्टी तपिजे । तपसहस्त्री ॥ पाषाणी वर्षिले । भस्मी हवन केले । खेंव दिधलें । साऊलीसी ॥** असं ज्ञानदेव म्हणतात. यज्ञ, दान तप, हे सारं पाषाणावर पडलेल्या पाऊसासारखे, राखेमध्ये आहूती दिल्यासारखे किंवा पडसाऊलीला आलिंगन दिल्यासारखे असते.)

**कायः क्लिष्टश्चोपवासैस्ततः किं**
**लब्धाः पुत्राः स्वीयपत्न्यस्ततः किम् ।**
**प्राणायामः साधितो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽ भूत् ॥७॥**

उपवास करून शरीराला क्लेश दिले, धर्मपत्नीपासून भरपूर संतति प्राप्त झाली, प्राणायाम आसने यांची कितीही साधना केली, तरी त्याचा उपयोग काय? आत्मसाक्षात्कार झाल्याविना सारं काही निरुपयोगीच! ('तैसे शास्त्रजात जाण। अवघेचि अप्रमाण अध्यात्मज्ञानेविण। एकलेनी॥' असं ज्ञानदेवांचंही निरूपण आहे.)

**युद्धे शत्रुर्निर्जिता वा ततः किं**
**भूयो मित्रैः पूरितो वा ततः किम् ।**
**योगैः प्राप्ताः सिद्धयो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतो ऽ भूत् ॥८॥**

युद्धामध्ये पराक्रम करून जय मिळविला, शत्रूंवर, मित्रांचा परिवार भरपूर मोठा असला, अष्टांगयोगाचा अभ्यास करून सिद्धि प्राप्त केल्या, तरी काहीहि साधणार नाही, कारण यामधून अहंकार व स्वार्थ बळावतो. सबब आत्मसाक्षात्कार ही खरी सिद्धी हाच जीवन मोक्ष ! (**'साधूनी बचनाग खाती तोळा तोळा । आणिकांते डोळां न पाहवे ।. साधून भुजंग धरितील हाती । आणिकें कापती देखोनियां ।** अशा सिद्धिंचा परामर्श तुकारामांनीही घेतलेला आहे.)

**अब्धिः पद्भ्यां लंघितो वा ततः किं**
**वायुः कुम्भे स्थापितो वा ततः किम् ।**
**मेरुः पाणावद्धृतो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥९॥**

पाण्यावरून चालण्याची सिद्धी मिळविली, कुंभक प्राणायामांचा अभ्यास भरपूर केला, शरीर निश्चल बनविले, समाधी अवस्थेंत तरी या सर्वांचा उपयोग नाही; आत्मसाक्षात्काराविना सारं व्यर्थच ठरतें. (**'चातुर्यलपवी'। महत्त्व हारवी। पिसेपण मिरवी। हे तु वीण ॥**' अशी वृत्ती यामधून निर्माण होत नाही)

**क्ष्वेलः पीतो दुग्धवद्वा ततः किं**
**बह्निर्जग्धो लाजवद्वा ततः किम्।**
**प्राप्तश्चारः पक्षिवत्खे ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१०॥**

दुधाप्रमाणे गटागट विष प्राशन केले काय किंवा विस्तवाचे निखारे भक्षण केले काय (लाह्यांप्रमाणें), पक्षाप्रमाणे आकाशात संचार करण्याचे सामर्थ्य मिळविले काय - सारचं निरूपयोगी. आत्मसाक्षात्काराविना सगळं फुकट ! (**'डोई वाढवूनि केश। भूतें आणिती अंगास ॥ तरि ते नव्हती संतजन। तेथे नाही आत्मखूण ॥**' असा तुकोबारायांचाहि दावा आहे.)

**बद्धाः सम्यकपावकाद्यास्ततः किं**
**साक्षाद्विद्या लोहवर्यास्ततः किंम्।**
**लब्धो निक्षेपोऽञ्जनाद्यैस्ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽभूत् ॥११॥**

अग्नि, वायु, जल आदींचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य प्राप्त केले काय, किमया विद्या प्राप्त करून लोखंडाचे सोने करता आले काय, नेत्रांमध्ये अंजन घालून भूमिगत धनाचा शोध घेतला काय - सार व्यर्थ; कारण यामधून स्वार्थ व अहंकार यांची वृद्धी होत राहील. आत्मसाक्षात्कार हीच खरी व उपयुक्त सिद्धी ! (**साधकाची दशा उदास असावी। उपाधी नसावी अंतर्बाह्य ॥**' हे वैराग्य अगत्याचे असते - तुकाराम)

**भूपेंद्रत्वं प्राप्तमुर्व्यां ततः किं**
**देवेन्द्रत्वं संभृतं वा ततः किम् ।**
**कालज्ञानं चापि लब्धं ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१२॥**

संपूर्ण भूखंडाचे अधिपत्य मिळाले, राजे महाराजांचं सम्राटपद मिळाले, शंभर अश्वमेघ यज्ञ करून इंद्रपदही प्राप्त झाले, जगद्गुरूचे श्रेष्ठ पद मिळविले - तरी हे सारं व्यर्थच कारण हे सार नश्वरच असतं. पौराणिककथांमध्ये अशी उदाहरणे भरपूर आहेत. आत्मसाक्षात्कार हेच अंतिम व सर्वकालीन सुख, समाधान, शांति व हीच मुक्ती ! (**'त्रिगुणांची गोवी उगवूनि'** असं संतांचं मागणं आहे. आत्मसाक्षात्कारामधूनच 'गुणातीत' अवस्था प्राप्त होते. इथेच संपूर्ण मुक्तता नांदते)

**मंत्रैः सर्वः स्तंभितो वा ततः किं**
**बाणैर्लक्ष्यो भेदितो वा ततः किं**
**मुंडीन्द्रत्वं चोपलब्धं ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१३॥**

मंत्रसामर्थ्याने स्तंभनशक्ति प्राप्त झाली, बाणांनी लक्ष्यवेधाची विद्या संपादिली, भूत-भविष्य यांचे त्रिकालज्ञान प्राप्त झाले. तरी सारं निरर्थक! आत्मसाक्षात्कार हेंच अंतीम ध्येयय असावें. (**कर्मकांड तरि जाणे।मुखोद्गत पुराणें । ज्योतिष्य तो म्हणे । तैसें होय ॥ व्याकरणी चोखडा । तर्की गहन गाढा । परि अध्यात्मीं चि फुडा। जात्यंधु ॥'** ज्ञानदेवांचेही असेच समांतर विचार आहेत. ज्ञानेश्वरी अ.१३)

**कामांतकः खंडितो वा ततः किं**
**कोपावेशः कुंठितो वा ततः किम्।**
**लोभाश्लेषो वर्जितो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१४॥**

काम, क्रोध, लोभ आदींना जिंकलं तरीही आत्मसाक्षात्कार याविना खरी विरक्ति व मुक्ती साध्य होणारच नाही. धर्मराज सर्व उपाधिमधून मुक्त झालेले होते; परंतु आत्मसाक्षात्कारपासून वंचित झाले असल्याने त्यांना सौख्य लाभले नाही व मोक्ष दूर राहिला. (**'आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंद चि अंग आनंदाचे ।'** ही अवस्था केवळ आत्मसाक्षात्कारानेच प्राप्त होते.)

**मोहध्वान्तः पेषितो वा ततः किं**
**जातो भूमौ निर्भदो वा ततः किम् ।**
**मात्सर्यार्तिर्मीलिता वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१५॥**

मोहरूपी अंधःकारातून बाहेर पडलं, अहंकार दूर झाला, 'निगर्वी' म्हणून कीर्ती प्राप्त झाली, षड्रिपूंला जिंकले, तरी एवढ्यावर भागत नाही. आत्मसाक्षात्कार झालाच पाहिजे. इथेच सायुज्य मुक्ति नांदते; कारण या अवस्थेंतच सुख-दुःख या दोन्हींचाही विलय झालेला असतो. (**'पुढे चाली नाही आवडीने ।'** असं तुकोबाय सांगतात ते एवढ्याच करिता)

**धातुर्लोकः साधितो वा ततः किं**
**विष्णोर्लोको वीक्षितो वा ततः किम् ।**
**शंभोर्लोकः शासितो वा ततः किं**
**येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽ भूत् ॥१६॥**

तपश्चर्येद्वारा सत्यलोक( ब्रह्माचे), वैकुंठ (विष्णूचे), कैलास (शंकराचे), प्राप्त करूनही कांही उपयोग नाही. आत्मसाक्षात्काराविना पर्याय नाही मुक्तिला! असं नसतं तर ब्रह्मा-विष्णू-महेश तपोमग्न झाले नसते. आत्मानंद आत्मसाक्षात्कार हेच जीवनाचे सर्वप्रमुख ध्येय असू शकते.; तेच जरुर असावे. आत्मानंदामध्येच चिदानंदाची एकरूपता असते.

इथे आचार्य निर्मित हे सर्वश्रेष्ठ स्तोत्र संपते. या स्तोत्रपठनाचं महत्त्व ते पुढे सांगतात - ते असं :

**यस्येंद न्हहये सम्यगनात्मश्रीगर्हणम् ।**
**सदादेति स एकात्मसाक्षात्कारस्य जनम् ॥१७॥**

आत्मसाक्षात्काराविना जगणाऱ्या माणसाचे विद्यावैभव कितीही महान असले, तरी ते शोभादायक ठरत नाही. हे स्तोत्र ज्याच्या मनांत ठसेल, तोच आत्मसाक्षात्काराला पात्र ठरेल.

**अन्ये तु मायिकजगद्भ्रांतिव्यामोहमोहिताः ।**
**न तेषां जायते क्वा ऽपि स्वात्म साक्षात्कृतिर्भुवि ॥१८**

याविना इतर लोक या मायामय जगाच्या भ्रांतिजालामध्ये गुरफटून जातात व गोंधळात पडतात. अशा मंडळींना आत्मसाक्षात्कार कधीही होत नाही - होणार नाही.

आत्मसाक्षात्कार म्हणजेच 'मी' पणाचा निरस सर्वत्र अनुभूत होणारा 'समरस' ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या १२ व्या अध्यायांत विवरण केलेलं आहे - **'तरि मन हें एक माझा स्वरूपीं वृत्तिक । करून घाली आणिक। बुद्धि ही हे ॥ इथें दोन्हिं सारिसिं । मजमाजि प्रेमेंसिं । रिगाली तरी पावसी। मातें चि तूं गा ॥ जरि मनें बुद्धि इहिं। घर केलें माझां ठाई। तरि सांधे मग काइ। तूंपण उरे ॥ म्हणौनि दिवा पालवे । सवें चि तेज मालवे । कां रविबिंबासवें । प्रभाशु जाये॥'**

दिवा मालविला की प्रकाश जातो किंवा सूर्य मावळला की सूर्यप्रकाश निघून जातो. त्याच्याप्रमाणे 'मी' पणा गेला कीं 'तू' पण उरत नाही आणि मन, बुद्धियांच्या पलिकडे असलेल्या आत्म्याचा साक्षात्कार झाला कीं 'द्वैत' संपते; भक्त-भगवतं वेगळे रहात नाहीत. सारं एकविध-एकनिष्ठ बनतं आमच्या सर्वच संतांनी याच तत्त्वज्ञानाचा अखंड मागोवा घेतलेला आहे. 'मी' पण गेलं की सगळी 'माया' च संपली. अंतीम 'शून्य' गांठणे म्हणजेच आत्मसाक्षात्कार. मग सारा आनंदच आनंद !

आचार्यांचं हे स्तोत्र म्हणजे 'अध्यात्म' गाठण्याचा राजरस्ता होय. रचना किती सुंदर आहे? प्रत्येक श्लोकाचं चौथ चरण एकच ठेवलेलं आहे त्यांनी. '**ततः किं**' या प्रासादिक शब्दांनी प्रत्येक चरणाचा शेवट आढळतो. दुर्दैव आजच्या पिढीचे ज्यांच्यावर गोड संस्कृत भाषेचे संस्कार नाहीत. संस्कृतासमवेत संस्कार गेले आणि मागे उरली आहे अवडंबरी बाष्कळता. हे स्तोत्र म्हणत असतां त्यामध्ये सांगितिकालय-ताल सारं अनुभवाला येतं आणि अंतःकरण आनंदित होऊन जातं. संस्कृत भाषा अवघड-ती बोलीभाषेत समाविष्ट होऊ शकत नाही हा एक खोटा प्रवाद आहे; आणि या प्रवादाखाली या भाषेला आम्ही दूर ठेवलं. अर्थात ज्ञानाला प्रासादिक साहित्याला, त्यांतील रमणीयतेला आपण मुकलो असंच म्हणावं लागेल.

卐卐卐

काव्यलता



# श्री साई बावन्नी

श्री साईबाबांच्या दर्शनाने, चिंतनाने अनेकांना काव्यस्फूर्ती लाभते. कोणी अष्टक लिहितो-कोणी त्यांच्यावर अभंग करतो. श्री. श्रीराम आठवले यांनी ५२ चरणांचे केलेले हे काव्य श्री साईबावन्नी -

१

| | | |
|---|---|---|
| | शिळेवर साई बसले | मनी रूप हे ठसलेले |
| २ | फिकीर विश्वाची ज्याना | शिरडी आवडली त्याना |
| ३ | रोखुनि डोळे ते बघती | मनातले आणि ओळखती |
| ४ | साई साई मी म्हणता | रसना प्रेमे ओलवता |
| ५ | दोन्ही डोळे हे भरता | मनोमलिनता मावळता |
| ६ | श्रद्धेचा उगवे चंद्र | लोप पावते ते तिमिर |
| ७ | सबुरी म्हणजे सोशिकता | धैर्याची शोभे माता |
| ८ | उदी ठसवते नश्वरता | संजीवक सगळ्या भक्तां |
| ९ | ती लावावी भाळाला | कां भ्यावे काळी काळाला ? |
| १० | ज्याच्या खांद्यावर झोळी | अभुभाची करतो होळी |
| ११ | कांदाभाकर आवडते | गाणे देवाचे रूचते |
| १२ | सबका मालिक एक ही है | उपदेशाचे सूत्रच हे |
| १३ | मानवतेचे बालक हा | शांतीचा आश्वासक हा |
| १४ | धर्माचा अभ्यासक हा | मांगल्याचा पूजक हा |
| १५ | जरी लेखणी ना धरली | उपनिषदे त्या स्फुरलेली |
| १६ | कोणासाठी शंकर हा | दत्तगुरु कोणासी हा |
| १७ | आकरी नच मावतसे | मनामनातुनी शिरलासे |

| | | |
|---|---|---|
| १८ | ज्ञानेश्वर आळंदीचा | तुकाराम हा देहूचा |
| १९ | पैठणचा जणु नाथ असे | या रूपे सद्‌भाव वसे |
| २० | दासगणु नि उपासनी | आवडती त्यांना दोन्ही |
| २१ | संतकवी स्त्रीचा त्राता | व्यवहारी मी निःस्पृहता |
| २२ | शिरडी तैसी साकोरी | तीर्थ क्षेत्रे भूमिवरी |
| २३ | देहाची सोडा ममता | मी असताना कां चिंता ? |
| २४ | जो कोणी पायरी चढे | भाग्य तयाच्या पुढे खडे |
| २५ | चुकले कोठे कळले ना | भगवंताला ये करूणा |
| २६ | साई साई असे म्हणा | कुणी अधिक ना कुणी उणा |
| २७ | रोग निपजतो देहात | उपचारही तो देहात |
| २८ | देव नांदतो भावात | धर्म वसे माणुसकीत |
| २९ | समता जगती वर्तावी | अहंभावना खंडावी |
| ३० | मोदाची गुढी उभवावी | शिरडीची यात्रा नहावी |
| ३१ | स्मराल तेथे मी आहे | स्मराल तेव्हा मी आहे |
| ३२ | स्मराल तैसा मी आहे | कणकण क्षणक्षण मी आहे |
| ३३ | पायघोळ कफनीच बरी | फडके माथी मुकुट जरी |
| ३४ | साई दीनास्तव दीन | साई लीनाहुन लीन |
| ३५ | साई वृद्धाचे आसू | साईबाळाचे हासू |
| ३६ | साई जैसा मशिदीत | मंदिरांत गुरूद्वारात |
| ३७ | चुकले हळहळ वाटूदे | माय आसरा देऊ दे |
| ३८ | सुधारणा ती घडवू दे | भक्तिपायावर आणू दे |
| ३९ | नरनारी सगळेच हरि | साईमाय तू असे करी |
| ४० | उजाड भूमी भिजवावी | हिरवा शालू ती ल्यावी |
| ४१ | नको रूक्षता वचनात | हवी सुजनता वृत्तीत |
| ४२ | आवेगे जवळी घ्यावे | बालकास या चुंबावे |
| ४३ | जाति भेद ते विसरावे | साई साई मी गावे |
| ४४ | उणे भरूनी ते काढावे | अंतर्मुख बनता यावे |
| ४५ | स्थल कालां ओलांडावे | विश्वात्मक मज बनवावे |
| ४६ | गीतेचा जडु दे छंद | रामकृष्ण हरि गोविंद |
| ४७ | साईसच्चरिता ध्यावे | जे न दिसे ते उमजावे |
| ४८ | माझा मी घेता शोध | कुठे काम कोठे क्रोध ? |
| ४९ | मशीदीतली दिपवाळी | बारामास घरी व्हावी |
| ५० | माझ्या नकळत हे व्हावे | मन मंदिरि साई यावे |
| ५१ | उघड दार मन खुळे करी | साईनाथा त्वरा करी |
| ५२ | साईबावन्नी इथे पूरी | साईचरणां रामधरी |

## काव्यलता

### बाबांचे उद्गार

अल्लाह भला करेगा
जो तु उसे याद करेगा
हे साई बाबांचे उद्गार
मना सांत्वना देती फार

नित्य देती प्रचिती बाबा
सुख सोडूनी करा धावा
मुक्ति चा साई रामबाण मंत्र
साई सारखा देव न अन्यत्र

अल्लाह म्हणे कोणी तुजला
ईश्वर म्हणौनी तुला पूजला
दिव्य शक्ती चे नाम साई
शिरडी जाचे निवास ठाई

संसार अथाह सुरेख सृष्टि
साई असु दे कृपा दृष्टि
पामर आम्ही अज्ञान पोर
पोटी घाली अपराध थोर

**किशोर तारे (भोपाळ)**




### साईलीला

जो नित भजती साईला, तोचि पावतो मोक्षाला ॥धृ.॥
गुरूरायाचे रूप चिरंतन
दो नयनांनी घ्यावे निरखुन
आनंदाश्रू येती हरखुन
भान नुरे जड देहाला, तोचि पावतो मोक्षाला ॥१॥
कफन नामे ही कफनी सुंदर
भक्ता उद्धरण्यास निरंतर
फडफड करिते ती अंगावर
पांघरण्या निज भक्ताला, तोचि पावतो मोक्षाला ॥२॥
भवपाशाचे तुटण्या बंधन
जोडितसे जो तव भक्ती धन
विश्रांतीचे अनुपम स्थान
जवळ करी तवचरणाला, तोचि पावतो मोक्षाला ॥३॥
मूर्ति विसावे पाषाणावरी
राबतसे मन दासाद्वारी
अगणित ज्ञान ते घाले अंतरी
अनुभवुनी साई लीला, तोचि पावतो मोक्षाला ॥४॥

**प्र.ग.तल्लारवार 'प्रगत'**

## काव्यलता



### ❋ प्रार्थना ❋

साई तुझे नांव, अमृता समान ।
वाचे उचारीता, मनी समाधान ॥

ध्यान मनी असो, सदा माझे साई ।
लिन असो मस्तक । सदा तुझे पाई ।
नांव तुझे घेता । भारावते मन ।
साई तुझे नांव । अमृता समान ॥१॥

दिनदुबळ्यांचा । धनी तूच साई ।
शिरडीस राहूनी । धावे भक्ता पाई ।
बाबा साई नाम । परिसा समान ।
वाचे उच्चारिता । मनी समाधान ॥२॥

अवलीया प्रगटला । गुरूस्थानी गेला ।
स्पर्श त्याचा होता । लिंब गोड झाला ।
चमत्कार पाहूनीया । आनंदीले मन ।
साई तुझे नांव । अमृता समान ॥३॥

साई साई म्हणोनी । शरण जो आला ।
होता स्पर्श चरणी । व्याधी मुक्त झाला ।
नको मोह माया । नको माझे धन ।
साई तुझे नांव । अमृता समान ॥४॥

साई माझी माता । साई माझा पिता ।
हे विश्वंभरा । तुची जगत जेता ।
मज नाही आता । तुझ विण कोण ।
साई तुझे नांव । अमृता समान ॥५॥

- जयसिंग भोसले

### राष्ट्रसंत तुकडोजी वाणी

शिरडीत बंधु माझा म्हणे 'आडकोजी'।
दुजा भाई शेगावात नांदतो अजी हो॥
तिजा ताजुद्दिन आमुचा, मित्र जीवभावे साचा ।
मुंगसाजी बंधु चौथा, आमुच्या भुजी हो ॥

साई खेड्या ही दादा, आमुचाही बंधुराजा॥
खटेश्वराची ही माझी, संगती गुजी हो॥
मायबाई माता आमुची, सर्वाभूती पान्हा पाजी ।
म्हणजे दास 'तुकड्या' यांची, भक्ती ना दुजी हो॥

बाल भक्तांसाठी



# श्री साईबाबांचे प्राणी प्रेम

**१९९६ मधील हा पहिला अंक, या अंकापासून खास बालभक्तांसाठी दोन पाने मजकूर प्रसिद्ध करण्यात येणार असून त्याद्वारे श्री साईबाबांची शिकवण बालवर्गात सूदूर प्रचार व्हावी अशी कल्पना आहे.**

**श्री साईबाबा हे केवळ मानव जातीवर नव्हे तर अवघ्या प्राणीमात्रांवर प्रेम करणारे करूणासागर होते. त्यांच्या 'साईसचरित्' ग्रंथातील अनेक कथातून आपणास बाबांचे प्राणी प्रेम दिसून येते. लहान लहान साईभक्तांना प्राण्यांच्या गोष्टी नेहमीच आवडतात हे लक्षात घेऊन या अंकात बाबांच्या जीवनातील प्राणी व त्यापासून घ्यावयाचा बोध विषयक लेख-**

श्री साईच्या बालभक्तांनो साईसत्चरित हा प्रासादिक ग्रंथ म्हणजे आजच्या युगातील 'गीताच'' होय. बालांपासून थोरांपर्यंत सर्वांना सुंदर जीवन जगता यावे म्हणून केलेला उपदेश आहे. आपण सर्वांनीच तो जाणून घेऊन आपल्या आचरणांत आणला पाहिजे. त्यासाठी तुम्हा बालकांना आवडणारे प्राणी की ज्यांचा उल्लेख साईचरित्रात आला आहे. अशा प्राण्यांची वैशिष्ट्ये व त्यांपासून घ्यावयाचा बोध तुम्ही लक्षपूर्वक वाचून समजून घ्या. व आचरणात आणा मग तुम्ही सर्वजण साईबाबांना अधिक प्रिय व्हाल तुमची सर्व तऱ्हेची काळजी साईबाबा घेतील व तुम्हांला चांगल्या तऱ्हेने खूप मोठे करतील बघा. चला तर आपण त्या प्राणीमित्रांना भेटू या.



**मांजर :** – मांजरी व तिची पिले यांचे एकमेकांवर नितांत प्रेम असते. पिले आईभोवती गोळा होतात. आईचे दूध पिण्यासाठी धडपडतात, आईच्या अंगावर उड्या मारतात. मांजरी पिलांवर गुरगुरते क्षणभर पिले शांत बसतात. पुन्हा आईने दूध पाजावे म्हणून तिच्या भोवती भोवती राहतात. त्या बाळांचे प्रेम पाहून मांजरीला पान्हा फुटतो, ती आपल्या बाळांना जवळ येऊ देते. त्यांना प्रेमाने पोटभर दूध पाजते. आपल्या चारी पायांत पोरांना कवटाळते, चाटते.

**बोध :** आपण साईबाबांवर अगदी अशाच पद्धतीने भक्ती प्रेम करावयास हवे. पिलांची आपल्या आईवर अनन्य भक्ती असते. त्यापायी आईला पान्हा फुटतो त्याप्रमाणे साईबाबांविषयी आपल्या मनात प्रेमाचे उमाळे यावयास पाहिजेत. म्हणजे साईंची आपल्यावर कृपा होईल. साई आपल्यांवर प्रेमाचा वर्षाव करतील. आपला योगक्षेम चालवतील.



**श्यामसुंदर घोडा** :– घोडा चपळ, ऐटदार, प्रमाणिक व नेकदार असतो. साईबाबांचा श्यामसुंदर नावाप्रमाणे सुंदर घोडा होता. साईबाबांची गावातून मिरवणूक निघे तेव्हा तो पालखीपुढे नाच करी. दोन पायांवर उभा राहून साईबाबांना वंदन करी. त्याची अशा प्रकारची सेवा साईबाबांनी मान्य करून घेतली. त्याच्या मृत्यूनंतर साईबाबांनी त्याची सेवा समजून घेऊन त्याची समाधि बांधण्यास सांगितली त्याला सद्गती प्राप्त करून दिली.

**बोध :** संतांच्या संगतीत राहिल्याने माणसाचेच नव्हे तर प्राण्याचेही भले होते. घोड्याने साईंची सेवा केली ती सेवा बाबांना आवडली, माणसाला बुद्धि विचार, करण्याच शक्ती आहे. नवविधा भक्तींपैकी जमेल त्या भक्ती मार्गाने साईबाबांची सेवा भक्ती केली तर आपले कल्याण साईबाबा नक्कीच करतील.




**व्याघ्र किंवा वाघ** :– वाघ हा जंगली प्राणी क्रूर, दुष्ट समजला जातो. असाच एक रोगग्रस्त वाघ दरवेशाने साईदर्शनाला आणला. साईंच्या सहवासात आल्यावर त्याचा क्रूरपणा, दुष्ट प्रवृत्ती नाहीशी झाली. त्याच्या वेदना साईबाबांनी दूर केल्या. साईचरणांशी एक गगनभेदी आरोळी ठोकून तो वाघ गतप्राण झाला. साईंच्या पायांजवळ त्याला चिरंशाती मिळाली. संतसंगतीमुळे त्याच्यातील वाईट अवगुण निघून गेले.

**बोध :** संतसंगती सदा घडो. म्हणजे माणसातील अहंकार, मद मत्सर लोभ, विकार दूर झाले तर सारे सद्गुणच आपल्याजवळ राहतील. साई आपले भले करतील. सज्जनांच्या सहवासाने मोक्ष मिळतो.




**सर्प व बेडुक :–** सर्प व बेडूक हे एकमेकांचे शत्रू. सर्प नेहमी बेडकाला गिळकृत करून संपवायला टपलेला. परंतू सर्प व बेडूक हे पूर्व जन्मात साईबाबांचे भक्त होते. त्यांची नावे वीरभद्र व बसवप्पा. माणूस योनीत असताना नर देहाचे भले केले नाही. लोभ त्यातून वैर व त्यामधून हव्या अशा दुष्टचक्रात सापडून पुढील जन्मातही एकमेकांचे शत्रू झाले. सर्प व बेडूक होऊनही.

**बोध :** ऋण म्हणजे कर्ज, हत्या व वैर कधीही करू नका. नाही तर आपली अवस्था सर्प व बेडकासारखी होईल. त्यासाठी अनेकदा जन्ममृत्यू च्या फेऱ्यात आपणांस अडकावे लागेल.




**डुक्कर :–** डुकराला नेहमी चिखलात रहावयास आवडते. तो तोंडाने नेहमी घाण चिवडत असतो. कितीही झाले तरी घाणीतच राहणार. एकदा साई-बाबांनासौ तर्खडबाईंनी भाजीभाकरीचा नैवेद्य आणला. वाटेत एक डुक्कल आले. त्य डुकराला त्यांनी चतकोर भाकरी खावयास दिली. उरलेली भाकरी नैवेद्य म्हणून साईबाबांना दिली. साईबाबा तर्खड बाईंना म्हणाले, 'आई आज माझ लई पोट भरलं. हे बघ ढेकर येतात.'' तर्खडबाईंना काही कळेना त्या म्हणाल्या, 'बाबा ! मी आत्ताच तुमच्यासाठी नैवेद्य घेऊन आले. आताच मी तुम्हाला भाकरी अर्पण केली.'' साईबाबांनी सांगितले,''आई ! तू मघा डुकराला भाकरीचा तुकडा दिलास ना ! त्याची भूक आणि माझी भूक एकच. अशीच सर्वांची भूक जाणावी. भुकेल्या आधी भाकर द्यावी नंतर आपण खावी म्हणजे श्रीहरी तुष्ट होतो.''

**बोध :** माणसाला बुद्धि व मन दिले आहे. त्यामुळे चांगला विचार करून चांगल्या मनाने मुखाने चांगले तेच बोलावे. कोणाची निंदा नालस्ती करू नये. हरीनामात दंग रहावे नाही तर आपली अवस्था डुकराप्रमाणे होईल.




**कासवी :–** कासवी व तिची पिले यांचे प्रेम, माया अनन्य साधारण असते. नदी किंवा समुद्राच्या एका तीरावर कासवी असते. तर तिची पिले पैलतटी असतात. परंतु आपल्या आईच्या दृष्टीप्रेमाची केवळ ऊत त्यांना पैलतटी दूरवर असूनही वाढवत असते. मिळत असते. त्या आधारानेच ती सुरक्षित रहातात. ती पिले दूरच्या काठावर असून सुद्धा आपल्या आईचाच विचार करत आईकडे लक्ष लावून बसलेली असतात.

**बोध :** आपणही आपल्या गुरूमाऊली साईबाबांकडे अनन्य दृष्टीने पहात राहिलो, ध्यानी-मनी त्यांच्याच विचारा रहिलो तर बाबा आपल्याकडेच कृपादृष्टीने पहाणार आपले भले करणार.



**मुंगी :–** किती क्षुद्र प्राणी. परंतु अविरत परिश्रम, नेहमी पुढे जाणे अथक कष्ट करणे, संघटना चतुर साईबाबांचे भक्त काशिराम शिंपी यांना साईबाबांनी मुंग्यांना नेहमी साखर खाऊ घालण्यास सांगितले. साईची आज्ञापालन ते करू लागले. एकदा दुसऱ्या गावी जात असताना वाटेत यांना दरोडेखोरांनी लुटले. त्यांच्या जीवावर उठले. त्यावेळी शिर्डीत द्वारकामाईत बसलेल्या साईबाबांनी मुंग्यांना आज्ञा केली, ''जा अन् माझ्या भक्ताला सोडवा.'' त्याबरोबर असंख्य मुंग्यांना पंख फुटले त्या क्षणात उडत जंगलात गेल्या दरोडेखोरांना कडकडून चावल्या व काशिराम शिंप्याची सुटका केली.

**बोध :** कोणी श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. एखादा छोटा प्राणी सुद्धा मोठ्यातल्या मोठ्या प्राण्याला संकटातून सोडवतो. म्हणून प्रत्येक प्राण्याचा आत्मा शांत ठेवा. सर्व प्राण्यांकडे समदृष्टीने पहा.



**पाल :–** भिंतीवर सरपटणारा प्राणी. चुकचुक आवाज करीत आपल्या भावना प्रकट करते. सर्वसाधारण समज असा की पालीचे अंगावर पडणे अथवा चुकचुकणे अशुभ मानले जाते. परंतु हा गैरसमज साईबाबांनी दूर केला. एकदा एका भक्ताने साईबाबांना विचारले, ''बाबा! ही पाल भिंतीवर चुकचुकत आहे. काय अशुभ घडणार आहे?' तेव्हा साईबाबा म्हणाले,''ती आनंदाने चुकचुकत आहे. तिला तिची बहीण भेटणार आहे. एवढ्यात औरंगाबादेहून

साईभक्त आला. त्याच्या पिशवीतून एक पाल बाहेर आली ती चटकन भिंतीवरील पालीजवळ जाऊन चुकचुकु लागली. दोघी एकमेकींच्या मागे भिंतीवर गिरक्या घेऊन तोंडाने आवाज करीत राहिल्या.

**बोध :** मुक्या प्राण्यांना, पशू पक्ष्यांना चांगल्या वाईट भावना असतात. सुख-दु:ख असतात ती आपण समजून घेतली पाहिजेत.तसेच शुभ-अशुभ ह्या वादात पडू नये. प्रत्येक क्षण हा शुभ समजून सण म्हणून समजावा व सत्कर्मात सत्‌विचारात रहावे.



**कुत्रा :–** अत्यंत प्रामाणिक, स्वामीनिष्ठ प्राणी. सौ तर्खड आई लक्ष्मीबाई, यांनी आणलेली भाकर कुत्र्याला खायला दिली व स्वत: तृप्ततेचे ढेकर दिले. तर बाळा शिंपी यांना लक्ष्मीचे देवळात काळ्या कुत्र्याला दहीभात खाऊ घालण्यास सांगितले. त्यांचा हिवताप रोग बरा केला. श्वान रुपात येऊन बाबांनी भक्तांना तारले.

**बोध :** सर्व प्राण्यांत साईरूप पहाण्यास शिका. सर्वांवर प्रेम करा.

**– साईसेविका**

卐卐卐

## साईसत्‌चरितातील प्राण्यांविषयींच्या ओव्या -

१) कधी मी श्वान कधीं मी सूकर ।
कधी मी गाई कधी मी मांजर ।
कधी मुंगी, माशी जलचर ।
ऐसिया रुपे विचरत मी ॥१२९॥ (अध्याय ९)

२) कीड, मुंगी, जलचर खेचर.।
प्राणीमात्र श्वास सूकर ।
अवघ्या ठायीं मीच निरंतर ।
भरलो साचार सर्वत्र ॥७२॥ (अध्याय १५)

३) कासवी जैसी आपुले पोरां ।
घोलिते निजदृष्टीचा चारा ।
तैसीच माझे गुरूजी तऱ्हा ।
दृष्टीने लेकरा सांभाळी ॥६७॥ (अध्याय १९)

४) विंचू काय, सर्प काय ।
ईश्वरचि सर्वांचा ठाय ।
तयाचि इच्छा नसतां अपाय ।
करवेल काय त्यांचे नी ॥१७६॥ (अध्याय २२)

५) व्याघ्रासारिखा क्रूर प्राणी ।
तो काय मनुष्यापरी ज्ञानी ।
परी तोही लागे तयांचे चरणीं ।
अघटित करणी बाबांची ॥१२५॥ (अध्याय ३१)

६) नुकतीच पाजून गेली बाहेरी ।
मागुतेनि आली जरी मार्जारी ।
तरी फिरफिरोनी पोरे तिजवरी ।
धावती प्रेमभरी लुंचावया ॥१२॥ (अध्याय १५)

७) बाबा ही पाठीसी भिंतीवरी ।
कमर्थ हो पाल चुकचुक करी ।
काय असावें तियेचे अंतरी ।
अशुभकारी नाही ना ॥८४॥ (अध्याय १५)

८) सर्पही तो जैसा काळ ।
ऐसा मोठा जबडा विशाळ ।
बेडूकही मोठा विक्राळ ।
परी तो फराळ सर्पाचा ॥१५६॥ (अध्याय ४७)

९) आघाडी घोडा तो ताम्रवर्ण ।
नाम जयाचे श्यामकर्ण ।
घुंगुरे झणत्कारिती चरण ।
सर्वारण मंडीत जो । ॥१४६॥ (अध्याय ३७)

# लेखक-कवी आणि भक्तांना नम्र निवेदन

लेखक-कवी आणि भक्तांनी आपले लेख-कविता-अनुभव 'श्री साईलीला'साठी जरूर पाठवावेत. त्यांचे सहर्ष स्वागतच आम्ही करू. परंतु ते साहित्य पाठविताना खालील सूचनांचे पालन करावे ही विनंती—

★ लेख-कविता या अध्यात्मिकपारमार्थिक विषयावरच असणे आवश्यक आहे. सामाजिक विषयाचा उद्देश उद्‌बोधक व समाजहितैषी असेल तरच त्याचा विचार होईल.

★ लेख-कविता-अनुभव हे कागदाच्या एकाच बाजूस पुरेसा समास सोडून लिहावेत. पाठपोट लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.

★ लेख-कविता-अनुभव यांची हस्तलिखित वा टंकलिखित मूळ प्रतच पाठवावी. झेरॉक्सप्रत पाठवू नये.

★ अनुभव कथानामध्ये ते श्री साईबाबांशी संबंधितच असावेत. तसेच ते इतरांना वाचण्यासारखे असावेत. अत्यंत खासगी स्वरुपाचे अनुभव पाठवू नयेत. अनुभव कथनाचे लेखन विज्ञानयुगाचे भान ठेवून केले जावे.

★ कोणतेही साहित्य आमच्याकडून पोस्टेजज खर्च करून परत पाठविले जाणार नाही तरी आपल्या साहित्याची एक प्रत स्वतःकडे जरूर ठेवावी.

★ साहित्य मिळाल्याची पोच, ते मिळताच पाठविली जाते आणि योग्य मजकूर नजिकच्याच अंकात प्रसिद्ध केला जातो.

★ लेखासमवेत आवश्यक ते फोटोग्राफ-चित्रे जरूर पाठवावीत.

**संपादक**
**'श्री साईलीला'**

ग्रंथ परिक्षण

विद्यानंद

# 'भक्तीरसायन रहस्य'

# मराठी साहित्यात मोलाची भर

भक्ती साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या 'भक्तिरसायन' या एका सुंदर संस्कृत ग्रंथाचा अनुवाद **'भक्तिरसायन रहस्य'** या नावाने वेद शास्त्र संपन्न गोपाळशास्त्री गोरे यांनी केला असून त्यायोगे मराठी भक्ती साहित्यात एका अमूल्य ग्रंथाची भर पडली आहे.

या ग्रंथामुळे 'भक्तिरसायन' या दुर्मिळ अशा संस्कृत ग्रंथाचा परिचय मराठी वाचकांना होणार असून त्याबरोबरच श्रीमदभागवताच्या दशमस्कंधाच्या पूर्वार्धात भगवान श्रीकृष्णाचे जे भक्तजन चित्ताकर्षक चरित्र श्री शुक्राचार्य यांनी गायले, त्याची मधुरताही या ग्रंथाने मराठी वाचकाला ज्ञात होणार आहे.



भक्तिरसायन नावाचे संस्कृत मध्ये दोन ग्रंथ आहे. एक मधुसुदन सरस्वती यांचा तर दुसरा श्री हरिसूरि यांचा. श्री गोरेशास्त्री यांनी श्री हरिसूरि यांच्या ग्रंथाचा मराठी अनुवाद केला आहे. हा ग्रंथ श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधातील पूर्वार्धातील श्लोकातून जे भगवद् चरित्र सांगितले गेले त्याचे शब्द सौंदर्य व भावसौंदर्य प्रगट करणारा असून मराठी वाचकांना भक्तीभावाचे यथेच्छ रसपान करणारा आहे.

या ग्रंथास वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू व गाढे विद्वान वैकुंठवासी धुंडामहाराज देगलूरकर यांची अधिकारसंपन्न प्रस्तावना लाभली असून वाचकांना ती एक मेजवानीच ठरावी अशी चिंतनीय आहे.

श्रीगोपाळशास्त्री गोरे हे भागवत कथा सांगणारे एक नामवंत भागवतकार असून संस्कृत वाङ्मयातील अनेक ग्रंथावर त्यांचे प्रभुत्त्व आहे. 'जीवनमुक्ती विवेक' व 'गोपीगीत' असे दोन ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. हा तिसरा ग्रंथ शास्त्रीबुवांच्या अधिकारसंपन्नतेचेच एक दर्शन आहे. ५९१ पानांच्या या ग्रंथाची किंमत केवळ १०० रुपये असून आजच्या अत्यंत महागाईच्या काळात इतक्या स्वस्त किंमतीत एवढा अमूल्य ग्रंथ उपलब्ध करून देऊन ग्रंथ प्रकाशन समितीने अत्यंत स्तुत्य कार्य केलेले आहे.

卐 卐 卐




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली ७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी इंग्रजी आणि मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे; असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय.

## अभिप्राय
### वाचकांचे

## आत्मबोधाचा आनंद

**मा. महोदय !**

माहे मे-जून ९५ आणि सप्टेंबर-ऑक्टोबर ९५ दसरा विशेषांक अवलोकन केले, दोन्ही अंक सर्वोत्तम आहेत त्याबद्दल अभिनंदन. विविध स्वरूपाचे विविध ज्ञानाचे या अंकात लेख अधिकारी लेखकांकडून लिहून घेऊन समाविष्ट केल्यामुळे अगणित साईभक्तांना बौद्धिक व अध्यात्मिक आत्मबोधाचा आनंद मिळाला आहे. दोन्ही अंकाची सजावट अप्रतिम आहे. विशेषत: अमरनाथ यात्रा, अहिल्यादेवी, साईभक्तीचे मर्म, नाथ संप्रदाय हे लेख अतिशय मनोज्ञ व सर्वांग सुंदर वाटले. श्री साईबाबांच्या कृपेने हे नियतकालिक आमचे असेच उत्तरोत्तर प्रबोधन करीत राहो व आम्हाला पावन करो.

**कवि नागेश मोगलाईकर**
(विशेष कार्यकारी दंडाधिकारी, धुळे.)

## माहितीपूर्ण-वाचनीय अंक

**मा. कार्यकारी संपादक यांना –**

गेले दहा वर्षापासून आम्ही 'श्री साईलीला' चे आजीव सभासद आहोत. गेले वर्षभर अंक मिळणेच बंद झाले होते. परवा साईलीला कार्यालयात मी येऊन गेले तेव्हा मे-जून ९५ व सप्टेंबर-ऑक्टोबर ९५ चे दोन अंक मिळाले. दोन्ही अंक माहितीपूर्ण व वाचनीय आहेत. विशेषत: अध्यक्ष श्री द.म.सुकथनकर यांची मुलाखत व विद्यमान विश्वस्त मंडळाचे कार्य यातून संस्थान विषयी सुरेख माहिती मिळालेली आहे. श्री निंबाळकर यांचा लेख खूप आवडला. १९९६ जानेवारी पासून बालवाचकासाठी श्री साईबाबांविषयक सदर सुरू करावे त्यासाठी अंकातील दोन पाने राखून ठेवावीत ही विनंती.

**सौ. भावना दा. जेऊरकर**
डोंबिवली




'श्री साईलीला' हे नियतकालिक श्री साईबाबा संस्थान शिरडीच्या वतीने गेली ७४ वर्षे प्रकाशित होत असून हिंदी इंग्रजी आणि मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या या नियतकालिकाने पारमार्थिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावलेली आहे; असे अनेक मान्यवरांचे मत आहे.

'श्री साईलीला' बाबतचे काही बोलके अभिप्राय.

# अभिप्राय
## वाचकांचे.

## अध्यक्षांच्या मुलाखतीने संतोष

मा. अध्यक्ष यांसी -

सप्टेंबर-ऑक्टोबर ९५ च्या पुण्यतिथी विशेषांकातील कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी घेतलेली आपली प्रदीर्घ मुलाखत वाचल्यावर, आपले अभिनंदन करण्यासाठी हे खास पत्र लिहावे वाटले म्हणून लिहित आहे.

मी एक साईभक्त आहे. १९५५ पासून बाबाकडे आकर्षित झालो आहे. तसा नियमित शिर्डीस जाऊ शकलेलो नाही. माझा व आपला तसा मुळीच परिचय नाही पण एक कर्तबगार प्रशासक म्हणून मुंबई महापालिका आयुक्त असल्यापासून तुमच्याबद्दल मला आदर आहे. त्यामुळेच शिरडी संस्थानच्या अध्यक्षपदी आपली निवड झाल्याचे ऐकून, योग्य जागी योग्य व्यक्तिची निवड झाल्याचा संतोष मला वाटला आहे. आपणास माझ्या शुभेच्छा !

श्री ताठे यांनी घेतलेली आपली मुलाखत खर म्हणजे 'मुलाखत कशी असावी' याचा उत्कृष्ट नमूना आहे असे मला वाटते. कसलीही भीड न ठेवता आपण दिलेली उत्तरे वाचूनच मला हे पत्र लिहिण्याची स्फूर्ती झालेली आहे.

चंद्रकान्त मु. पौडवाल (माहिम मुंबई)

## नवे बदल उत्तम

मा. संपादक, श्री सुकथनकर यांना -

आपला परिचय नसताना मी श्री साईलीला वाचून हे पत्र लिहिण्याचे धारिष्ट्य करीत आहे त्याबद्दल क्षमस्व. मी श्री बाबांचा १९५४ पासूनचा भक्त आहे. दरवर्षी न चुकता शिर्डीस जातो. संस्थानचा आजीव सभासदही आहे. मुद्दाम पत्र लिहण्यास कारण म्हणजे श्री साईलीलातील नवे बदल व स्वरूप मला खूप भावले आहे. पूर्वी मोठ मोठे कंटाळवाने व त्याच त्याच लेखकांचे लेख असत. आता आपण छोटे छोटे लेख देता त्यामुळे वेगवेगळे विषय वाचण्यास मिळतात. व अनेक नव्या नव्या लेखकांना आपण संधी देत आहात तेही उत्तम आहे.

पुण्यतिथी विशेषांक अत्यंत परिपूर्ण व मोहक वाटला.

अरविंदराव शिंदे

उपअभियंता, अकोला.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | पोष्टकार्ड | - |
| ३. | दगडावर बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोष्टकार्ड | ०.३० |
| १३. | पालखी (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | दगडावर बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. ९.०० आहे.

# श्री साईंच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरूचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |

Registered with the Registrar
of News-papers of India
No. MH/527



श्री साईबाबांचे प्रत्यक्ष व दुर्मिळ छायाचित्र

श्री साईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत नियतकालिक मार्च-एप्रिल १९९६

# श्री साईलीला

रु. ८





# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## विश्वस्त मंडळ

श्री. द. म. सुकथनकर

(अध्यक्ष)

श्री. मोहन मो. जयकर

श्री. रमेश दा. सोनी

श्रीमती रेखा ग. दिघे

श्री. प्रकाश व. कारखानीस

श्री. मुकेश र. पटेल

श्री. मधुकर द. जोशी

श्री. प्रकाश पी. वैशंपायन

श्री. मधुकर ज. गर्दे पाटील

श्री. देवकीनंदन सारस्वत

श्री. आप्पासाहेब खं. कोते

श्री. रायभान ग. चिने

श्री. भास्कर शं. बोरावके

श्री. अण्णासाहेब सा. म्हस्के पाटील

श्री. दयालाल हि. पटेल

श्री. राजीव पुं. रोहोम

श्री. संभाजी कि. काळे

श्री. अशोक भि. खांबेकर

सौ. प्रेमाबाई सी. बज

श्री. रामचंद्र नि. गोसावी

श्री. प्रभाकर तु. बोरावके

श्री. सोपान मा. थोर्डे

श्री साईबाबा संस्थान शिरडीचे,
अधिकृत नियतकालिक

# श्री साईलीला

वर्ष ७४ अंक १२-१

मार्च - एप्रिल
१९९६

**रामनवमी विशेषांक**

संपादक
✦ द. म. सुकथनकर ✦

कार्यकारी संपादक
✦ विद्याधर ताठे ✦

**कार्यालय**

'साईनिकेतन',
८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी : ४१२२५६१
फॅक्स : (०२२) ४१५ ०७९८

**मुद्रक** : गीता ऑफसेट, वडाळा, मुंबई
**टाईपसेटींग** : श्री ऑफसेट, मुंबई

वार्षिक वर्गणी - रु. ५०/-
आजीव सभासद वर्गणी - रू. १,०००/-
परदेशाकरिता वार्षिक वर्गणी - रु. १०००/-
(टपाल खर्चासहित)
अंकाची किंमत रु. ८/- फक्त

मुद्रक, प्रकाशक द. म. सुकथनकर, अध्यक्ष श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी हे नियतकालिक, 'साईनिकेतन', ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई - ४०००१४ येथे छापून प्रसिध्द केले.

या नियतकालिकातील लेखांत प्रसिध्द झालेली मते ही त्या लेखातील लेखकांची स्वतंत्र मते असून त्या मताशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.



## श्री साईलीला 'रामनवमी' विशेषांक

## अंतरंग

- **संपादकीय** : द. म. सुकथनकर (२)
- **साईप्रचिती** : भक्तांचे अनुभव (४)
- **जया मनी जैसा भाव** (६)
- **शिरडीतील रामनवमीचा श्रीगणेशा** : कै. गो. र. दाभोळकर (श्री साईसच्चरित अध्याय ६ वा) (७)
- **मर्यादापुरुषोत्तम श्रीराम** : महामहोपाध्याय बाळशास्त्री हरिदास (१९)
- **रामनाम** : महात्मा गांधी (३३)
- **राम एक आदर्श** : डॉ. राममनोहर लोहिया (३४)
- **श्रीरामचंद्राचा जयजयकार कशासाठी ?** : शि. म. परांजपे ('काळ' कर्ते) (३५)
- **नित्य विजयी रघुनंदन** : विद्याधर ताठे (३९)
- **रामराज्यातील न्यायदान** - (४३)
- **संत तुलसीदासांचा 'श्रीराम'** - (४५)
- **महाबळी हनुमान** : संत तुकाराम कृत अभंग (४७)
- **बाल साईभक्तांसाठी** : साईसेविका (४८)
- **साई चिंतन** : शाम जुवळे (४९)
- **शिरडी वृत्त** - (५०)
- **रामनवमी उत्सव (१९९५) क्षणचित्रे** - (५४)
- **अभिप्राय** - (५६)

# संपादकीय...

**राम रामेति रमे रामे मनोरमे ।**
**सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ।।**

आदिशक्ती देवी पार्वती आपले पती गौरीशंकर यांना रामनामाचे महत्त्व विचारते तेव्हां भगवान शंकर वरील एका श्लोकात रामनाम महात्म्य कथन करतात अशी पद्मपुराणामध्ये एक कथा आहे. या कथेतून रामनामाचे महत्त्व भाविक भक्तांना सहजपणे स्पष्ट होते. प्रभू रामचंद्र हे काश्मीर ते कन्याकुमारी पर्यंत पसरलेल्या भारताचेच नव्हे तर भारतीय उपखंडाच्या सांस्कृतिक एकात्मकतेचे प्रतिक आहे. यामुळेच भारतामध्ये रामनवमी उत्सवाचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. ही जनमनाची भक्तीभावना लक्षात घेऊनच श्री साईबाबांनी रामनवमीच्या वेळी यात्रा भरविण्यास व पुढे श्री रामजन्मोत्सव करण्यास आपली अनुमती दिली असावी असे मला वाटते.

श्री साईबाबांच्या अनुमतीने शिरडी येथे इ. स. १८९६ मध्ये उरुस-यात्रा भरविण्यास प्रारंभ झाला. ही यात्रा रामनवमीच्या दिनी भरवावी अशी साईबाबांनी आज्ञा केलेली होती. रामनवमीचा हा योग साधून पुढे बाबांच्या संमतीने इ. स. १९१२ मध्ये रामजन्माचा उत्सव सुरु करण्यात आला. यंदाच्या वर्षी; १८९६ मध्ये प्रारंभ झालेल्या त्या यात्रा परंपरेची शताब्दी होत आहे तर रामजन्मोत्सवाचा ८४ वा सोहळा साजरा होत आहे. त्या निमित्ताने **'श्रीसाईलीला'** चा प्रस्तुतचा **श्रीरामनवमी विशेषांक** आपल्या हाती देताना मला सेवाकार्यपूर्तीचा एक अनामय आनंद होत आहे.

प्रस्तुतचा श्री रामनवमी विशेषांक हा 'मार्च-एप्रिल' चा अंक असून तो अत्यंत वेळेवर प्रकाशित करण्यात येत आहे. ही श्री साईबाबांचीच कृपा आहे. या विशेषांकात **'श्रीराम'** विषयक बरेच दुर्मिळ व अपरिचित असे साहित्य आम्ही संपादन करून साईभक्तांपुढे सादर केलेले आहे. महात्मा गांधी, डॉ. लोहिया, महामहोपाध्याय बाळशास्त्री हरिदास,

यांचे श्रीराम कार्यगौरव करणारे दुर्मिळ विचारधन तसेच शिरडीत प्रारंभ झालेल्या श्रीरामजन्मोत्सवाचा समग्र इतिहास कथन करणारा **'श्री साईसच्चरित'** मधील एक अध्याय आणि कार्यकारी संपादक विद्याधर ताठे यांनी लिहिलेला 'नित्य विजयी रघुनंदन' हा संतसाहित्यातील रामकथेचा आढावा घेणारा लेख आदी साहित्य वाचकांचा रामनवमीचा आनंद द्विगुणीत करेल असे मला वाटते.

या अंकात शिरडी येथील वार्ता - घटना भाविक साईभक्तांना कळाव्यात यादृष्टीने **'शिरडीवृत्त'** ही देण्यात आले असून यापुढील प्रत्येक अंकात असे वृत्त देण्यात येणार आहे. साईभक्तांना केंद्रबिंदू मानून मी व माझे सहकारी विश्वस्त संस्थानचे कार्य करीत आहोत. हे कार्य भक्तांना माहित होण्यास **'श्रीसाईलीला'** हे एक उत्तम माध्यम आहे असे समजून दर अंकात शिरडीवृत्त देण्याचे आम्ही ठरविलेले आहे.

**'श्रीसाईलीला'** चे अंक आता वेळेवर प्रकाशित होत आहेत व पुढेही असेच वेळेवर अंक प्रकाशित होतील याविषयी आम्ही अत्यंत दक्ष आहोत. अंक वेळेवर प्रकाशित होण्याबरोबरच तो अधिकाधिक वाचनीय व संग्राह्य वाटावा असाही आमचा प्रयत्न आहे. या प्रयत्नांचे स्वागत करणारी अनेक अपरिचित वाचकांची पत्रे मला येत आहेत. त्यांचे धन्यवाद मानावे तेव्हढे थोडेच होतील. अशाप्रकारे वाचकांचा वरचेवर प्रतिसाद लाभावा अशी अपेक्षा आहे.

साईभक्तांना नम्र विनंती आहे की त्यांनी **'श्रीसाईलीला'** मराठी वाचकांच्या घरोघर पोचविण्याची जिद्द् मनी बाळगून अधिकाधिक वर्गणीदार करून घ्यावेत व साईसंदेशाने-साईभक्तीने साऱ्या महाराष्ट्राची शिवभूमी दुमदुमून टाकावी.

**या हो या हो अवघे जण । करा बाबासी वंदन ॥**

**- द. म. सुकथनकर**



# श्रीसाई प्रचिती

## भक्तांचे अनुभव



**श्री साईबाबांना समाधिस्त होऊन आज सुमारे सात दशके होऊन गेली आहेत. पण आजही बाबांचे अस्तित्व भक्तांना जाणवते, आजही भक्तांना विविध रुपात बाबा दर्श देतात-मार्गदर्शन करताल-रक्षण करतात बाबांच्या प्रचितीचे भक्तांनी कथन केलेले काही अनुभव भक्तांच्याच शब्दात-**

श्री साईबाबा या जगात अदृश्यपणे सतत वावरत आहेत. त्याची प्रचिती साक्षात्कारी रुपाने सर्वानांच येते,

माझे एक गोव्याचे भक्त मला भेटणेसाठी श्री साई-बाबा मंदिरात आले. त्यावेळी मी मुंबई जाण्याचे गडबडीत होतो. मंदिरातील कांही महत्त्वाचे काम करीतच मी त्याचेशी बोलत होतो. चहा मागविला होता. मंदिरातील कांही महत्त्वाचे काम करीतच मी त्यावेळी मी मुंबईस जाण्याचे गडबडीत होतो. मंदिरातील कांही महत्त्वाचे काम करीतच मी बोलत होतो. चहा मागविला व आम्ही दोघांनी चहा घेतला व मी ही निघालो व तेही निघाले. त्यावेळी नुकताच श्री गुरुपोर्णिमा उत्सव झाला होता. बुंदी महाप्रसादाच्या पुड्या माझ्या कपाटात होत्या. त्या अशाच बाहेर गांवच्या भक्तांना देणेसाठीच कपाटात ठेवल्या होत्या, परंतु मला त्यांना कांही पुडी देणेची आठवण झाली नाही. इतका मी गडबडीत होतो. १२.३० गडबडीत होतो. १२.३० वा. स्टँडवर गेलो.गाडी मिळाली तेव्हा कोठे माझे मन शांत व स्थीर झाले. गाडीत मी कोणाशीच बोलत नसतो. फक्त श्री साईंचे चिंतन करीत करीतच प्रवास करीत असतो. अशा चिंतनाचे वेळीस मला श्री साईंनी आठवण करून दिली की, तुझ्या गोव्याचे भक्तास महाप्रसादाचे बुंदाची पुडी दिली नाहीस. ही आठवण होताच मला फारच दुःख झाले, कारण प्रसाद हा अशाच भक्तांचेसाठी कपाटात ठेवलेला असतो. असो चुक झाली हे खरच व त्याचीच चुटपुट सारखाच मनात घोळत होतो व फारच वाईट वाटत होते. असो हा विषय तेथेच सोडून दिला.

पुढे कांही दिवसांनी तेच भक्त माझे ध्यानात आले व मी ही त्यांना पुडी दिली नाही त्याचे वाईट वाटू लागले. कपाटात पुड्या किती आहेत ह्याची मी कांहीचे पाहणी केली नव्हती. जो येईल त्यास पुडी देणे ऐवढे असते. किती शिल्लक आहे. हा विचार त्यावेळी मी करतीच नसतो पुढे दोन महिन्याने मला गोव्याचे त्या भक्तांचे ध्यानात दर्शन झाले. त्याच बरोबर दुसरे दिवशीच ते माझे भक्त मला भेटणेसाठी गोव्याहून आले आणि मी आश्चर्य चकीत झालो आणि त्यांना म्हणालो की कालच तुम्ही धान्यात आला होता आणि मागील दोन महिन्याचे भेटीचे वेळी मी गडबडीत असल्यामूळे तुम्हाला मी महाप्रसादाची पुडी देणेस विसरलो व आपण दोघेही आपआपले कामास निघून गेलो. तुम्हीस पुडी दिली. नाही त्याची मला जाण गाडीत बसढेवर मन शांत झालेवर झाली व फारच वाईट वाटले तर आता तुम्हीच या कपाटात प्रसादाची पुडी आहे का ते तुम्हीच पहा आणि घ्या आणि काय आश्चर्य फक्त व एकच पुडी त्या कपाटात अगदी मागील बाजूस होती. ती त्यांनी काढली व ती पुडी तुमचीच आहे. श्री साईनीच माझे मनाची बाजूस होती. ती त्यांनी काढली व ती पुडी तुमचीच आहे. श्री साईनीच माझे मनाची तळमळ व तुमचेबाबतची कळकळ ह्याची जाणीव ठेवून पुडी त्याच कपाटात कोणासही सहज दिसणार अशी ठेवून दिली. ती तुमचे करीताच आहे, असे म्हणून त्यांनी ती पुडी घेतली व मीही हा काय साक्षात्कार, कसा घडला ते सर्व सविस्तर त्यांना कथन केले व तेही भारावून गेले व त्यांनाही आश्चर्याचा धक्काच बसला. श्री साई आपणांसाठी कसे धावून येतात व आपले भक्तांचे मनोगत कसे पुरे करतात हेच ह्यावरून दिसून येते. ह्यावरून एवढे वाटते की, श्री साई म्हणतात, "माझा जो झाला काया वाचा मने त्याचा मी ऋणी सर्व काळ" ह्याची प्रचीती येते. हा महान साक्षत्कार व आपले जिवंतपणांची साक्ष व श्री. साईनी दाखवून दिली आहे.

साईबाबांच्या दरबारात येणाऱ्या भक्त सौ. आवळे ह्या दर गुरुवारी श्री. साईबाबांचे दर्शनास व दरबारातून उदीच्या पुड्या घेण्यासाठी येतात. त्याफारच एकनिष्ठ भक्त आहेत व त्यांची श्री साईबाबांचेवर एकनिष्ठ श्रध्दा आहे. त्यांना दरबारात श्री साईबाबांनी "श्री साईमहिमा" ही ११ पुस्तके भक्तांना वाटणेचा आदेश दिला. तो आदेश मिळताच त्या मला म्हणाल्या मला बाबांनी ११ साईमहिमा ही पुस्तके भक्तांना वाटणेचा आदेश दिला. तर मला ११ पुस्तके द्या. मी त्यांना देणेसाठी जवळ

ठेवलेली पुस्तके उचलली व ती मोजली तर अकराच निघाली. म्हणून पुन्हा मोजली तर अकराच निघाली. दरबारातील सर्व भक्त व त्या ताईही थक्क झाल्या. श्री साईंनी आदेश दिला त्यांनीच तो आपले साक्षात्काराने सिध्द करून दाखविला.

*- साईरंग महाराज,*
*सातारा.*

* * *

जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
तरी मी धावेन भक्तांसाठी ।।

स्वामी-आणि साई एकच !

**मी** पहिल्या पासुन स्वामी भक्त माझे माहेर अक्कलकोट पण माझ्या मालकांनी ३५ वर्षापूर्वी शिरडीस जाऊन बाबांचा फोटो आणला. व नंतर नियमीत घरी बाबांची पुजा आरती गुरुवारी हारपेढे वगैरे सर्व काही चालू झाले. सगळे जण बाबांचे भक्तच झालो पण माझ्या मनांत नेहमी स्वामीची मूर्ती व स्वामीमंत्र नेहमी चालत असे. एकदा मी हैद्राबादला मुलांकडे गेले व तिकडे दिल सुख नगरला श्री साईबाबांच्या मंदिरी दर्शनास गेले. पण काय आश्चर्य तिथे मला स्वामीचे दर्शन झाले व पुन्हा पुन्हा मी डोळे मिटुन उघडुन बघते तर साई-स्वामी-स्वामी-साई असे सारखे सारखे दिसले. तर दोघेही एकच मला खूप आनंद झाला. डोळे भरून आले. मी कधी भेद केलेला नव्हता पण साक्षात मूर्तीत दर्शन देऊन मला धन्य केले. माझे जिवीत धन्य धन्य झाले असे मला वाटले व जैसा भाव तैसा देव.

*- श्री. द्रौपदी केरकर*
तांदूर (आंध्रप्रदेश)

* * *

**कॉ**लेजमध्ये असल्यापासून मला साईबाबांचे 'साई लीला' हे मासिक वाचायची आवड लागली होती. त्यातील साईबाबांच्या लीलेचे प्रत्यय वाचून मनातील मनातील साईबाबांबद्दलची भक्ती दुणावत असे. मला आलेली साई प्रचिती पुढिल प्रमाणे - गेल्या जूनमध्ये (१९९४) आमच्यावर अचानक संकटे एकामागून एक चालून आली. माझ्या जावेचे 'थायराईडचे' ऑपरेशन झाले त्याच सुमारास माझ्या सासुबाई डायबिटीस व ब्लडप्रेशरने बऱ्याच आजारी झाल्या. मानसीला औषधाची ऍलर्जी होऊन हॉस्पिटलमध्ये ठेवावे लागेल. ह्या सर्व संकटांना सामोरे जाण्यासाठी आम्ही वाशीला रामराम ठोकून परत चुनाभट्टीच्या जागेत एकत्र राहण्यास सुरुवात केली.

माझी मुलगी-मानसी व दिरांची मुलगी-दोघी एकाच वयाच्या. दीरांच्या मुलीला सायन येथील 'अवर लेडी ऑफ गुड कौंसिल ' मध्ये आधीच ॲडमिशन मिळाली तर दोघी एकत्र शाळेत जातील या विचाराने मानसीलाही त्याच शाळेत घालावे असे वाटले. म्हणून त्या शाळेच्या 'ब्रदर' ना भेटायला गेले व त्यांना अगदी शेवटच्या क्षणी शाळेत प्रवेश मागायाला का आलो ते समजावून सांगितले परंतू त्यांनी 'जागा शिल्लक नाही तरी प्रयत्न करतो' असे मोघम सांगून आमची बोळावणी केली. प्रत्येक भेटीला ते 'दोन दिवसांनी भेटा' असे सांगून टाळायला लागले. तो पर्यंत शाळा सुरू होऊन १५ दिवस झाले होते आमच्या आशाही मालवल्या होत्या इतके दिवस एकाच शाळेच्या मागे लागल्याने बराचवेळ फुकटही गेला होता व दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळवणे कठीण होऊन बसले. शेवटी नवस बोलले 'जर माझ्या मुलीला त्या शाळेत प्रवेश मिळाला तर, मी हा अनुभव साईलीला अंकात देईन आणि त्यादिवशी शेवटचा प्रयत्न म्हणून आम्ही दोघे त्याशाळेत 'ब्रदर' ना भेटायला गेले त्यांनी दुपारी चारला येऊन भेटा असे नेहमीचेच उत्तर दिले. मी मनातल्या मनात रडत ऑफिसला गेलो. ऑफिस मध्ये दुपारी चारला मी साईबाबांची पोथी मनातल्या मनात म्हणायला सुरुवात केली आणि काय आश्चर्य ! ठीक ५ वाजता माझ्या पतीचा फोन आला की मानसीला शाळेत प्रवेश मिळाला आहे. जी गोष्ट आम्हाला इतके श्रम घेऊन ही कठीण होऊन बसली होती ती साईबाबांच्या लीलेनेच साध्य झाली.


मग लवकरच आमच्या मनासारखे घर आम्ही विकत घेऊ शकलो. अर्थात घर विकत घेतानाही आमच्या मार्गात अनेक अडथळे येत होते परंतु त्या वेळी साईबाबांचे नामस्मरण चालू ठेवले व त्यांचे यथोचित फळ म्हणजे आमचे स्वतःचे घर झाले. आणि या सर्वांनवरच कळस म्हणा माझ्या पतींना त्यांच्या कार्यालयात बढती मिळाली. खरेच ! जर आमच्या मनात श्रध्दा असेल आणि फलप्राप्तीसाठी श्रम करण्याची व सबुरी धरण्याची तयारी असेल तर 'साईनामस्मरण' आपल्या इच्छा फलद्रुप करीत असते.

*- सौ. नीना साळवी (कुर्ला)*

* * *

# जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ।

बाबा हे परमात्म्याशी किंवा परमात्म्याच्या निरनिराळ्या रुपाशी अगदी मिसळून गेले होते. भक्तांनी जशी जशी इच्छा केली तसे बाबानी त्यांना दर्शन दिले . भक्तांच्या इच्छेसाठी श्रीसाईबाबा कधी राम झाले, कधी कृष्ण झाले. कधी पांडूरंग झाले तर कधी अक्कलकोटचे स्वामी समर्थ झाले. अनेकांना त्यांनी त्यांच्या गुरुच्या रुपात दर्शन देऊन. नवी व्यापक दृष्टी दिली. सर्व अवतार, सर्व संत हे वरुन भिन्न भिन्न दिसले तरी ते स्वरुपस्थितीने एकच असतात. हेच बाबांनी कोणताही शाब्दीक उपदेश न करता आपल्या दिव्य शक्तीद्वारे सर्व भक्तांना पटवून दिले.



एकदा दासगणू महाराज बाबांजवळ असताना त्यांना पंढपूरला पांडुरंगाच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली. त्यांनी बाबांजवळ परवानगी मागितली. परंतु बाबांच्या मनात दासगणूंना पाठवायचे नव्हते. म्हणून बाबा म्हणाले " अरे गणू शिरडी हेच आपले पंढरपूर. शिरडी सोडून जाण्याचे कारणच नाही. "

दासगणूंचा बाबांवर मोठा विश्वास असे. ते विचारु करु लागले की शिरडी हेच आपले पंढरपूर तर येथील पांडुरंग कोण ? या विचारात ते मग्न झाले. तोच बाबा त्यांना पांडुरंग स्वरुपात दिसू लागले. या प्रसंगावर दासगणूंचे एक सुंदर पद आहे. त्याची सुरूवात अशी -

" शिरडी माझे पंढरपुर । साईबाबा रमावर ।। "

गौळीबुवा नावाचे सत्पुरू वर्षाचे आठ महिने पंढरपुरास श्रीविठ्ठलाची सेवा करीत राहात, व चार महिने तीर्थयात्रा करीत. ते बाबांसमोर समाधी लावून बसत व सांगत की त्या स्थितीत बाबा हे त्यांना पंढरपूरचे विठोबाच दिसत.

प्रयागला गंगा व यमुना या दोन नद्यांचा संगम आहे. ते मोठे तीर्थस्थान आहे. एकदा तिथे यात्रेला जावे अशी दासगणूंना फार तळमळीची इच्छा झाली. बाबा म्हणाले, " गणू, आपले प्रयागतीर्थ इथेच आहे. "

यानंतर खरोखरच बाबांच्या दोन्ही आंगठ्यातून गंगायमुना वाहू लागल्या. दासगणूंना प्रयागाचे तीर्थ तिथेच लाभले.

श्री बापूसाहेब जोग यांना अक्लकोटच्या स्वामींना भेटण्याची ओढ लागली. तेव्हां बाबांनी त्यांना त्या स्वामीच्या स्वरूपात दर्शन दिले.

कित्येकांना बाबा कधी कधी द्वारकेच्या गोपाळकृष्णासारखेही दिसत.

मुंबईचे एक डॉक्टर रामाचे भक्त होते. ते बाबांना मानीत नसत. एकदा ते आपल्या मित्राच्या आग्रहाखातर त्याच्या बरोबर शिरडीस गेले. परंतु 'शिरडीस आलो तरी मी बाबांना नमस्कार करणार नाही' असे त्यांनी मित्राला निक्षून सांगून ठेवले होते. डॉक्टर व त्यांचे मित्र बाबांकडे चालले होते. परंतु बाबा दुरून दिसल्याबरोबर डॉक्टर देहभान हरपून धावत सुटले वर बाबांपुढे जाऊन त्यांनी लोटांगण घातले. बाबांनी त्यांना आशीर्वाद दिला. ते परत निघाल्यानंतर मित्राने विचारले, " डॉक्टर, हे काय केलंत तुम्हा ! तुमचा निश्चय तुम्ही विसरलात का ?"

डॉक्टर म्हणाले, " अहो, कसला निश्चय नि काय ? तिथे साईबाबा होतेच कुठे ? मला त्यांच्या जागी अयोध्यापति श्रीराम दिसले व मी त्याचेपुढे लोटांगण घातले ! " या डॉक्टरांना पुढे अपूर्व अशी परमानंद स्थिती लाभली.

एकदा नाशिकचे एक मोठे शास्त्री असाच निश्चय करून शिरडीस गेले. त्यांचे गुरू मोठे कर्मठ ब्राम्हण व त्यांनी बऱ्याच वर्षापूर्वी समाधीही घेतली होती. तरी बाबांनी त्या गुरूच्या रुपातच शास्त्रीबुवांना दर्शन दिले.

❑ ❑ ❑

# शिरडीतील रामनवमी उत्सवाचा श्रीगणेशा



*कवी - हेमाडपंत*

कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर हे श्री साईबाबांच्या निष्ठावान भक्तांपैकी एक होते. साईबाबांनी त्यांना 'हेमाडपंत' पदवी दिली होती. इंग्रजी राजवटीत मामलेदार व निवासी दंडाधिकारी आदी पदांवर त्यांनी कार्य केले. बाबांच्या लीलावर्णन करणारा 'श्रीसाईच्चरित' हा ग्रंथ त्यांनी साईबाबांच्या अनुमतीने लिहिला असून श्रीसाईभक्तांच्या दृष्टिने हा ग्रंथ गीता-ज्ञानेश्वरीच आहे.

हा ग्रंथ प्रकाशित होण्यापूर्वी अध्यायवार 'श्रीसाईलीला' मासिकातून प्रसिध्द करण्यात आला. ग्रंथाचे एकूण ५३ अध्याय असून आम्ही येथे 'रामनवमी उत्सव' विषयीचा एक अध्याय पुनर्मुर्दण करीत आहोत. साईभक्तांना हा अध्याय वाचून मूळ ग्रंथाकडे वळावे ही त्यामागे भावना आहे.

या अध्यायाद्वारे, शिरडीमध्ये रामनवमी उत्सवास कसा प्रारंभ झाला व पहिला उत्सव कसा साजरा केला गेला हे वाचकांना ज्ञान होईल.